IIP: WJHSS
IIP
World Journal of Humanities and Social Sciences

An Online Peer-Reviewed / Refereed Journal
Vol: 02 No. Issue I, (January-March) (2026)
Impact Factor: IIFS: 5.75
ISSN: 3107-6661 (Online)

# महात्मा बसवेश्वर उर्फ बसवण्णांचे क्रांतिकारी तत्वज्ञान

**प्रा. डॉ. नवनाथ रासकर**
तत्त्वज्ञान विभाग प्रमुख
मुधोजी महाविद्यालय फलटण

**Article Info**

***Article History:***
Received: 20th February 2026
Accepted: 01st March 2026
Published: 07th March 2026

***Keywords:***
*महात्मा, सामाजिक*

**ABSTRACT**

महात्मा बसवेश्वर हे एक थोर संत आणि महान तत्त्वज्ञ होते. विशेष म्हणजे लोकशाहीवादी विचारांना अवसर करून देणारे आणि अंमलात आणणारे एक महान समाज सुधारक आणि क्रांतिकारी विचारवंत होते. कर्नाटकातील बागेवाडी(जि.विजापूर) या गावामध्ये त्यांचा जन्म झाला,तर धर्मकार्य- क्रांतिकार्य आटोपल्यावर कुडलसंगम येथे त्यांनी कृष्णा-मलप्रभेच्या साक्षीने कुडलसंगमदेवाशी लिंगैक्य साधले आणि शिव तत्वात विलीन झाले. सामान्यपणे साठ-बासष्ठ वर्षांचा अवनीतलावरील त्यांचा हा वावर बाराव्या शतकात येतो. त्यांचा हा कालखंड सुमारे इसवी सन ११०५ ते ११६७ असा येतो असे म्हटले जाते.त्यांचे तत्त्वज्ञान मानवतावादी,लोकहिताचे आणि समताधिष्ठित असे होते. त्यांनी देवालय आधारित धर्म, रुढी,जातिभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा यांना नाकारुन शरण संप्रदाय किंवा लिंगायत धर्म घडवला.त्यांची शिकवण वचन साहित्यात आहे. हे वचन साहित्य हाच या धर्माचा धर्मग्रंथ आहे.

***Plagiarism Check Report:***
Date of Report: March 01, 2026
Similarity Index: 2%
Remarks: No significant matching text. All citations and matches are properly referenced. The manuscript is considered original.

Copyright © 2026 The Author(s). This is an open access article distributed under the Creative Commons Attribution License, (http://creativecommons.org/licenses/by/4.0/) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium, provided the original work is properly cited.

**How to Cite: Raskar, Navanath.** (2025). महात्मा बसवेश्वर उर्फ बसवण्णांचे क्रांतिकारी तत्वज्ञान. *IIP: World Journal of Humanities and Social Sciences (IIPWJHSS)*, 2(I), **493–495.**

महात्मा बसवेश्वर हे एक थोर संत आणि महान तत्त्वज्ञ होते. विशेष म्हणजे लोकशाहीवादी विचारांना अवसर करून देणारे आणि अंमलात आणणारे एक महान समाज सुधारक आणि क्रांतिकारी विचारवंत होते. कर्नाटकातील बागेवाडी(जि.विजापूर) या गावामध्ये त्यांचा जन्म झाला,तर धर्मकार्य- क्रांतिकार्य आटोपल्यावर कुडलसंगम येथे त्यांनी कृष्णा-मलप्रभेच्या साक्षीने कुडलसंगमदेवाशी लिंगैक्य साधले आणि शिव तत्वात विलीन झाले. सामान्यपणे साठ-बासष्ठ वर्षांचा अवनीतलावरील त्यांचा हा वावर बाराव्या शतकात येतो. त्यांचा हा कालखंड सुमारे इसवी सन ११०५ ते ११६७ असा येतो असे म्हटले जाते.त्यांचे तत्त्वज्ञान मानवतावादी,लोकहिताचे आणि समताधिष्ठित असे होते. त्यांनी देवालय आधारित धर्म, रुढी,जातिभेद, कर्मकांड, अंधश्रद्धा यांना नाकारुन शरण संप्रदाय किंवा लिंगायत धर्म घडवला.त्यांची शिकवण वचन साहित्यात आहे. हे वचन साहित्य हाच या धर्माचा धर्मग्रंथ आहे.

एकेश्वरवाद आणि इष्टलिंग संकल्पना- महात्मा बसवेश्वर हे एकेश्वरवादी तत्त्वचिंतक होते.त्यांच्या मते"देव असे एकची एक, तया नामे अनेक "वस्तुतः ईश्वर एकच आहे,फक्त तो अनेक नावांनी ओळखला जातो.हा ईश्वर सर्वव्यापी,सर्वशक्तिमान, सृष्टीचा कर्ता,करविता आणि दाताही आहे.त्यांनी या ईश्वराला म्हणजे शिवाला देवालयातून बाहेर काढले व माणसाच्या अंतरंगात आणून वसविले. म्हणूनच ते,

"इष्टलिंग धारण करता देहावरी
स्थावर लिंगास पुजू नये"

असे म्हणतात. इष्टलिंगाला धारण केल्यास मंदिरातील लिंग किंवा अन्य देवाची पूजा करु नये,ती अनाठायी असते.इष्टलिंग हे एक तत्त्व आणि प्रतीक आहे. ते मनुष्याला आपल्या हृदयातील शिवतत्त्वाची सतत आठवण करुन देणारे एक बाह्य प्रतीक आहे.ते व्यक्तीने आपल्या गळ्यात धारण करायचे असते. महात्मा बसवेश्वरांनी अध्यात्माचा अर्थ मानवी समता आणि लौकिक, सामाजिक जीवनाशी निगडित असा सांगितला.त्यामुळेच त्यांनी जातीभेद नाकारुन शिवाची स्थापना मानवी हृदयात, अंतःकरणात करुन समतेचा उदघोष केला.त्यांनी उपवास, यज्ञ, होम अशा कर्मकांडांना झुगारुन मानवी जीवनाला नीतीचे अधिष्ठान असले पाहिजे, हे जाणीवपूर्वक व उच्च रवाने सांगितले.

त्यांच्या तत्वज्ञानात कायकवे कैलास, दासोह, अनुभव मंटप, इष्टलिंग असे महत्त्वाचे सिद्धांत येतात.

कायक वे कैलास- या सूत्रानुसार कायक हेच कैलास,श्रम,कर्म हीच पूजा होय.आपले काम किंवा श्रम हेच सर्वस्व असते.म्हणून तेच कैलास असते. 'कायक' हा कन्नड शब्द असून त्याचे श्रम,कष्ट, सेवा, अर्पित काम असे अनेक अर्थ आहेत. कायकाद्वारे शिवतत्वाशी संधान साधले जाते.म्हणून तो कायकयोग असतो.त्यासाठी कायकाला महत्व द्यावे.त्याला सत्यता व शुद्धतेचे अधिष्ठान असावे.प्रत्येकाने आपली आवड किंवा कल पाहून आपले काम,व्यवसाय, नोकरी मनोभावे करावी.त्यातून मिळणाऱ्या मोबदल्यातून स्वतःचा उदरनिर्वाह करावा आणि जे उरलेले असेल ते समाजातील गोरगरीब अशा गरजवंतांना द्यावे.यास ते 'दासोह' म्हणतात. 'श्रमाची पूजा हीच शिव पूजा आहे' असा हा क्रांतिकारी विचार त्यांनी मांडला. मठ, मंदिर, पूजा, पाठ, कर्मकांड, पुरोहितशाही, ब्रह्मचर्य यांचे प्रस्थ कमी करून शरीर श्रमाला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महान कार्य महात्मा बसवेश्वर यांनी केले म्हणून त्यांना कायकयोगी असेही म्हणतात. असे लोकशाहीचे जनक महात्मा बसवण्णा या आपल्या ग्रंथात विचारवंत डॉ राजेंद्र चिकटे म्हणताना दिसतात. मानवी जीवनाच्या भौतिक आणि अध्यात्मिक उन्नतीचा हाच एक मार्ग आहे अशी बसवण्णांची भूमिका होती.

दासोह-या संकल्पनेचा अर्थ दान असाच होतो.हे एक दानच असते.पण दान पुण्य प्राप्ती किंवा अपेक्षेने केले जाते.ते जेव्हा निरपेक्षपणे केले जाते, तेव्हा तो 'दासोह' असतो.शिवाय ही संपत्ती सत्य व शुद्ध कायकातून मिळवलेली असल्याने दासोह हे दानापेक्षा श्रेष्ठ असते. म्हणजे दान प्रक्रियेमध्ये जे असते त्यापेक्षा अधिक दासोह या संकल्पनेतून व्यक्त होते.आपण समाज किंवा समष्टीचा भाग असतो.आपल्या घडण्यात त्याचा वाटा असतो.त्यामुळे आपण त्याचे काही देणे लागतो.या अर्थाने त्याचे त्याला देणे हे दान नसते तर,ते एक आपले कर्तव्य असते.हाच दासोह असतो.'मी आणि माझे' या वृत्तीतून मुक्ती मिळवण्याचा मार्ग म्हणजे दासोह होय.यामध्ये विश्वस्ताची वृत्ती असते.स्वतःसाठी कायक व समाजासाठी दासोह असा हा आगळावेगळा आणि अधिक समृद्ध विचार आहे. दासोहा मधून अपरिग्रह ही संकल्पना अधिक चांगल्या तऱ्हेने व्यक्त होते. अपरिग्रह म्हणजे न साठवणे. जे आपल्याला आवश्यक आहे तेवढेच जवळ बाळगणे, अधिकचा संग्रह न करणे होय. मग अधिकचे काय करायचे? या प्रश्नाचे उत्तर 'दासोह' या संकल्पनेतून मिळते असे म्हणता येईल.

अनुभव मंटप - या संकल्पने द्वारे व्यक्तीला आपले अनुभव संपन्न विचार प्रकट करण्याचे लोकशाही प्रधान एक समर्थ ज्ञानकेंद्र त्यांनी महात्मा बसवेश्वरांनी स्थापन केले होते.यामध्ये सर्व स्तरातील लोकांना व्यक्त होण्याचे स्वातंत्र्य होते.या अनुभव मंडपात तात्विक आणि व्यावहारिक विषयांवर विचार मंथन होऊन जो निष्कर्ष किंवा सिद्धांतरुपी अमृत मिळत असे, ते 'वचन' रूपात लिहिले जात असे. वचनाची भाषा ही सामान्य जनाची भाषा होती. एक सुजाण, विवेकी आणि समतावादी असा समाज घडावा ही धारणा यामागे होती.अशा तऱ्हेने महात्मा बसवेश्वरांनी शिव तत्वाला गिरीस्थानातून मानवी अंतःकरणात स्थापित करुन आपले चालू ऐहिक जीवन

अर्थपूर्ण बनवता येते,एवढेच नव्हे तर त्याद्वारे विश्वैक्यही साधता येते हे दाखवून दिले. अनुभव मंडपाद्वारे महात्मा बसवेश्वरांनी जणू लोकशाहीचे प्रारूप बाराव्या शतकात करून दाखवले होते.

संदर्भ ग्रंथ

१)डॉ राजेंद्र वि चिकटे, लोकशाहीचे जनक महात्मा बसवण्णा, नवी सांगवी, पुणे
२) डॉ नागोराव कुंभार, संपादक विचारशलाका , महात्मा बसवेश्वर विशेषांक, लातूर
३) अशोक कामत, महात्मा बसवेश्वर, पुणे, सत्संग
४) सूर्यकांत घुगरे, जगतज्योती बसवेश्वर, नांदेड
५) वेद प्रकाश डोणगावकर, महात्मा बसवेश्वरांचे तत्त्वज्ञान, स्वाती प्रकाशन, पूर्णा